Akash

**भारतातील राजकीय तटस्थता (Political Neutrality in India)**

भारतात सरकारी कर्मचारी लोकसेवा आचरण नियम १९५५ च्या कलम ४ नुसार शासकीय कर्मचाऱ्यांवर काही निर्बंध टाकून त्यांना राजकीय दृष्ट्या तटस्थ बनविले जाते.

१. कर्मचाऱ्याने शासनाशी एकनिष्ठ राहून निःपक्षपातीपणे कार्य पार पाडावे.
२. संसद, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक शासकीय कर्मचाऱ्याला लढविता येत नाही. निवडणूक लढवायची असेल तर प्रथम पदाचा राजीनामा द्यावा लागतो.
३. निवडणुकीत कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रचार करता येत नाही.
४. कर्मचाऱ्याला केवळ मतदानाचा अधिकार दिला गेला आहे. परंतु मतदान कोणाला केले हे जाहीरपणे सांगता येत नाही.
५. सनदी सेवकाला कोणत्याही राजकीय पक्षाचे सदस्यत्व स्वीकारता येत नाही.
६. सनदी सेवकांचे कुटूंबिय कोणत्याही राजकीय पक्षाला देणगी देवू शकत नाहीत.
७. सनदी सेवकांनी निवडणूक आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक आहे. निवडणूक आचारसंहितेचा भंग करणाऱ्या कर्मचाऱ्याला कडक शिक्षा देण्याची तरतूद आहे.
८. लोकसेवा आचरण नियम १९५५ च्या कलम ५ व ६ नुसार सरकारी कर्मचारी हे साहित्य, कला व वैधानिक बाबी वगळता इतर कोणत्याही बाबींवर आपले विचार व्यक्त करू शकत नाहीत. केवळ गुप्त मतदानाचा मर्यादित अधिकार सोडला तर सरकारी कर्मचाऱ्यांना कोणत्याही राजकीय कार्यात भाग घेता येत नाही.

राजकीय तटस्थता ही कर्मचारी प्रशासनापुढील अत्यंत गंभीर समस्या आहे. कर्मचाऱ्यांच्या राजकीय तटस्थतेबाबत घटनात्मक आणि कायदेशीर तरतूदी केल्या असल्या तरीदेखील एक प्रमुख प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे प्रशासनातील कर्मचारी राजकीयदृष्ट्या पूर्णतः तटस्थ राहणे शक्य आहे काय? बहुतांशी प्रशासकीय विचारवंतांच्या मतानुसार कर्मचारी पूर्णतः राजकीय दृष्ट्या तटस्थ राहणे अशक्य आहे.

***



M.A S.Y. Samudre Mam

प्रकरण - नववे

# वित्तीय प्रशासन

## (Financial Administration)

Financial Administration is that part of government organisation which deals with collection, preservation and distribution of public funds, with the management of credit operation on behalf of the state, and with the general control of the financial affairs of public household. - **Gaston Gaze**

वित्तीय प्रशासन लोकप्रशासनाचा अविभाज्य घटक आहे. शासन जनतेकडून किंवा इतर मार्गाने वित्त प्राप्त करते आणि सार्वजनिक कार्याकरिता खर्च करते. या दोन्ही क्रिया करण्यासाठी शासकीय व्यवस्था निर्माण करावी लागते, एक शिस्त निर्माण करावी लागते. यासाठी शासन जी यंत्रणा निर्माण करते त्याचा समावेश वित्तीय प्रशासनात होतो.

प्रशासनाचा जो भाग सार्वजनिक वित्ताची वसुली, संरक्षण आणि वितरणाशी संबधीत असतो, सार्वजनिक आय आणि व्यय यांचे समायोजन, राज्याच्या वतीने केल्या जाणाऱ्या प्रत्येक व्यवहाराची व्यवस्था आणि प्रशासकीय खात्यांच्या वित्तीय व्यवहाराचे सामान्य नियंत्रण या बाबीशी निगडीत असतो, त्याला 'वित्तीय प्रशासन' असे म्हणतात.

कुशल कर्मचारी व वित्त या बाबी प्रशासनाला कार्यप्रवण बनवतात. 'कर्मचारी' हा प्रशासनरूपी यंत्राचा 'चालक' (Driver) असतो तर वित्त हे त्या यंत्रातील 'इंधन' (Fuel) असते. शासनाची ध्येयधोरणे, योजना व विकासाचे कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी वित्ताची उपलब्धता महत्त्वाची ठरते. राष्ट्रीय विकास साधण्यासाठी मनुष्यबळ व वित्ताची योग्य सांगड घालणे आवश्यक असते, म्हणून वित्तीय प्रशासनासारख्या यंत्रणेची गरज निर्माण झाली आहे.

आधुनिक काळात लोकप्रशासन व वित्तीय प्रशासन एकरूप झाले आहेत. ज्याप्रमाणे माणूस व त्याची सावली एकमेकांपासून विभक्त करता येत नाही, त्याप्रमाणे वित्तीय प्रशासनाला लोकप्रशासनापासून विभक्त करता येत नाही.

"Finance and administration can not be devorced. Every administrative act has its financial implications as inseparable - as a man and his shadow." - **L.D. White.**

सजीवांच्या जीवनात प्राणवायुला (ऑक्सीजन) जे महत्त्व असते अगदी तसेच महत्त्व लोकप्रशासनात वित्तीय प्रशासनाला प्राप्त झाले आहे. वित्तीय प्रशासन हा प्रत्येक शासनव्यवस्थेचा 'आत्मा' (Soul) आहे. त्यामुळेच राष्ट्रावर नियंत्रण ठेवायचे असेल तर वित्त व्यवस्थेवर नियंत्रण ठेवावे लागते.

**अर्थ व व्याख्या (Meaning and Definitions)**

पुढील काही विचारवंतांनी सांगितलेल्या व्याख्यांमधून वित्तीय प्रशासनाचा बोध होतो.

**एल. डी. व्हाईट**

'सरकारी नोकरांना पैसा उपलब्ध करून देणे आणि उपलब्ध केलेल्या पैशाचा कार्यक्षम व कायदेशीर मार्गाने खर्च झालेला आहे किंवा नाही याची शहानिशा करणे यासाठी केलेल्या सर्व क्रिया म्हणजे वित्तीय प्रशासन होय.'

**पिफनर**

'अंदाजपत्रक तयार करणे, त्याला कायदेमंडळाची मान्यता घेणे, अंदाजपत्रकाची अंमलबजावणी करणे, कोषागार व्यवस्था व लेखापरीक्षण कार्य या सर्व क्रिया म्हणजे वित्तीय प्रशासन होय.'

**एफ.डब्ल्यू. विलोबी**

'वित्तीय प्रशासन म्हणजे एखाद्या कार्यक्षम सरकारपुढील महत्त्वाची समस्या होय, ज्याशिवाय प्रशासन कोलमडू शकते.'

**सर्वसाधारण व्याख्या**

'वित्तीय प्रशासन म्हणजे शासनाच्या वित्तीय बाबींचे नियोजन व नियंत्रण करणे होय.'

वरील व्याख्यांचा परामर्श घेतल्यास असे लक्षात येते की, वित्तीय प्रशासनाद्वारेच वित्तीय बाबींचे नियोजन आणि नियंत्रण केले जाते. कोणत्याही शासनपद्धतीत वित्तीय प्रशासन ही पायाभूत आवश्यकता असते. ज्या देशाचे वित्तीय प्रशासन सदृढ व भक्कम असते. त्या देशातील लोकप्रशासन व शासन यंत्रणा प्रबळ असते. म्हणूनच याबाबत कौटील्याने राज्याची सर्व कार्ये वित्तावर अवलंबून असल्याचे प्रतिपादन केले आहे.

**वित्तीय प्रशासनाची व्याप्ती (Scope of Financial Administration)**

कोणत्याही विषयाची व्याप्ती म्हणजे त्या विषयाची कार्यकक्षा किंवा कार्यक्षेत्र होय, या अर्थाने विचार केल्यास वित्तीय प्रशासनाची व्याप्ती म्हणजे वित्तीय



प्रशासनाची कार्यकक्षा किंवा कार्यक्षेत्र होय. अर्थातच, पैसा निर्माण करण्यापासून तो सांभाळणे, वितरण, नियंत्रण, विनियोग इ. वित्तविषयक सर्व कार्यांचा समावेश वित्तीय प्रशासनात होतो.

**वित्तीय प्रशासनाची व्याप्ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल**

**१. वित्ताचे नियोजन**

सार्वजनिक कल्याणाची धोरणे व योजना अंमलात आणण्यासाठी वित्ताची आवश्यकता असते. नियोजनाच्या माध्यमातून लोकवित्त एकत्रित करणे. अंदाजपत्रक तयारकरून त्याद्वारे शासनाचा आय वाढविणे.

**२. शासनाच्या तिजोरीचे संरक्षण**

शासनाचा सर्व मार्गांनी आलेला महसूल सरकारी तिजोरीत जमा केला जातो. शासनाच्या विविध कार्यासाठी लागणारा पैसा सरकारी तिजोरीतूनच उपलब्ध करून दिला जातो. वित्तीय प्रशासनात सरकारी तिजोरीचे संरक्षण हे जोखमीचे कार्य असते. शासनाच्या तिजोरीचे संरक्षण ही बाब वित्तीय प्रशासनाच्या कार्यक्षेत्रात येते.

**३. सार्वजनिक वित्ताचे वितरण**

सार्वजनिक वित्ताचा वापर जनकल्याणासाठी करावा लागतो. यासाठी सार्वजनिक वित्ताची वितरण व्यवस्था करणे.

**४. लोकवित्ताचा विनियोग**

सार्वजनिक वित्ताचा जनकल्याणासाठीच योग्य विनियोग होण्याच्या दृष्टीने लक्ष ठेवणे.

**५. सार्वजनिक वित्तावर नियंत्रण**

सार्वजनिक पैसा हा जनतेच्या कष्टाचा पैसा असतो. त्यामुळे त्यांचा गैरवापर होऊ नये यासाठी सार्वजनिक वित्तावर नियंत्रण ठेवणे.

**६. आय व व्ययात समन्वय**

शासनाची उत्पन्न व खर्चात योग्य समन्वय प्रस्थापित करून योग्य संतूलन साधणे.

**७. आर्थिक धोरण निश्चिती**

शासनाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक धोरणे ठरविणे.

**८. कंपनी, महामंडळ व वित्तीय संस्थावर नियंत्रण**

सार्वजनिक कंपन्या, महामंडळे व शासनाने निर्माण केलेल्या वित्तीय संस्थावर वित्तीय नियंत्रण ठेवणे.

**९. लेखा व लेखापरिक्षण**

सार्वजनिक लेखे व त्या लेख्यांचे परिक्षण विषयक कार्य करणे.

**१०. संसदेच्यां अर्थविषयक समित्या**

विविध संसदीय आर्थिक समित्या संबंधी कार्य करणे.

**११. वित्त आयोगाच्या स्वरूपात**

वित्तीय आयोगाच्या स्वरुपात आर्थिक बाबतीत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडणे.

**१२. सार्वजनिक कर्जाची व्यवस्था**

सार्वजनिक कर्जाची व्यवस्था म्हणजेच लोकऋण प्राप्त करणे व त्याची परतफेड करणे यासंबंधी कार्य.

**१३. राज्याच्या वित्तीय कार्यावर नियंत्रण**

राज्याच्या वित्तविषयक कार्याचे नियंत्रण करण्यासंबंधी कार्य.

वित्तीय प्रशासनाची व्याप्ती अतिशय व्यापक आहे, वरील बाबींचा समावेश व्याप्तीमध्ये होतो. वित्तीय प्रशासन शासन व्यवस्थापनाचाच एक भाग आहे. वित्तीय प्रशासन कलाही आणि शास्त्रही आहे. वित्तीय प्रशासनाची व्याप्ती वित्त व्यवस्था आणि वित्तीय प्रणालीच्या सिद्धांतावर आधारीत आहे.

**वित्तीय प्रशासनाची तत्त्वे**

**(Principles of Financial Administration)**

वित्तीय प्रशासनाची पुढील चार प्रमुख तत्त्वे आहेत.

**१. प्रभावी नियंत्रण (Effective Control)**

वित्तीय प्रशासन यशस्वी होण्यासाठी सर्व वित्तीय व्यवहारावर प्रभावी नियंत्रण असले पाहिजे. प्रभावी नियंत्रण म्हणजे नियोजित पद्धतीने सार्वजनिक आयप्राप्ती आणि व्यय या क्रिया चालाव्यात आणि पैशाचा अपव्यय होऊ नये.

**२. नियंत्रण व उत्तरदायित्व यांची संलग्नता**

**(Co-existence of Control and Responsibility)**

वित्तीय प्रशासनात नियंत्रण व उत्तरदायित्व यात एकरूपता असली पाहिजे असे हे तत्त्व सांगते. वित्तीय प्रशासनावर केवळ एकाच संस्थेचे नियंत्रण असले पाहिजे आणि त्या संस्थेची जबाबदारीही निश्चित केली पाहिजे.

**३. संसदेचे सार्वभौमत्व (Soverenty of the Parliament)**

लोकशाहीमध्ये संसद लोकांचे प्रतिनिधीत्व करते. त्यामुळे राजस्व वित्तावर अंतिम नियंत्रण संसदेचे असले पाहिजे.



**४. सरलता आणि नियमबद्धता (Simplicity and Regulated Nature)**

वित्तीय प्रशासनाचे स्वरूप गुंतागुंतीचे आहे. ते नि:संदिग्ध व सर्वसामान्यांना आकलन होईल असे असावे. वित्तीय प्रशासनाच्या कार्याचे स्वरूप नियमबद्ध असावे. प्रशासकीय कार्यक्षमता, मितव्ययता, कार्याचा वेग आणि शिस्त यासाठी प्रत्येक कामाचे नियम निश्चित केले पाहिजेत.

सार्वजनिक वित्ताचे नियोजन आणि कार्यवाही करण्यासंबंधी वरील तत्त्वांचे पालन केले जाते.

**वित्तीय प्रशासनाचे महत्त्व**

**(Importance of Financial Administration)**

आधुनिक काळात वित्तीय प्रशासनाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच आहे. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१. शासनाच्या कार्यक्षेत्रात वाढ**

पुर्वी शासनाचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. परंतु आधुनिक काळात 'व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत' (Cradle to Grave) सर्वच कार्ये शासनाला करावी लागतात. शासनाच्या कार्यक्षेत्रात वाढ झाल्यामुळे आपोआपच वित्तीय प्रशासनाचे महत्त्व वाढले.

**२. समाज परिवर्तनाचे साधन**

वित्तीय प्रशासन हे समाजपरिवर्तनाचे महत्वाचे साधन ठरले आहे. प्राचीन काळी समाज अप्रगत व मागासलेला होता. अंधश्रद्धा, निरक्षरता, दारिद्र्य, बेरोजगारी या समस्यांमुळे समाज संत्रस्त होता. समाजाला या सर्व समस्यांमधून मुक्त करण्यासाठी व नवसमाज निर्मितीचे एक प्रमुख साधन म्हणून वित्तीय प्रशासन महत्वाचे ठरते.

**३. लोककल्याणकारी राज्याचा स्वीकार**

पुर्वीच्या राज्याचे स्वरूप पोलीस राज्य (Police State) होते. परंतु आधुनिक काळातील राज्याने कल्याणकारी राज्याची (Welfare State) भूमिका स्वीकारली. कल्याणकारी राज्यात जनतेचा सर्वांगीण विकास करणे हे राज्याचे कर्तव्य ठरते. यासाठी लागणारा पैसा उभारणे, त्याचा योग्य विनियोम करणे ही महत्त्वपूर्ण जबाबदारी वित्तीय प्रशासनाला पार पाडावी लागते.

**४. बलशाली व समर्थ राष्ट्राची उभारणी**

बलशाली व सामर्थ्यवान राष्ट्राची उभारणी करणे केवळ वित्तीय प्रशासनामुळेच शक्य होते. आज जगात अमेरिका, फ्रांस, इंग्लंड, जपान ही राष्ट्रे

आर्थिक महासत्ता म्हणून ओळखली जातात, हे केवळ उत्कृष्ट वित्तीय प्रशासनामुळेच शक्य झाले आहे.

**५. लोकशाही शासनप्रणाली**

लोकशाही शासनपद्धतीमध्ये शासनाकडून जनतेच्या भरपूर अपेक्षा असतात. या अपेक्षांची परिपूर्ती करण्यासाठी वित्तीय प्रशासनाचे महत्त्व वाढले आहे. लोकशाहीत शासनाच्या तिजोरीतील पैसा जनतेचा असतो. या पैशाचे व्यवस्थापन, संरक्षण व योग्य विनियोग करण्यासाठी वित्तीय प्रशासन महत्त्वाची भूमिका बजावते.

**६. ध्येय - धोरणांच्या पूर्ततेचे साधन**

शासनाची ध्येय धोरणे कितीही चांगली असली तरी वित्ताअभावी ती अंमलात येवू शकत नाहीत. म्हणून सरकारच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेचे साधन म्हणून वित्तीय प्रशासनाकडे पाहिले जाते.

**७. विकासाचे साधन**

राष्ट्राचा सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय विकास करण्यासाठी व विकास विषयक उपक्रमाचे संचालन करण्यासाठी वित्तीय प्रशासन महत्त्वाचे ठरते.

**८. प्रत्येक प्रशासकीय कृतीचा आधार**

वित्तीय प्रशासनाशिवाय लोकप्रशासनाचे पानही हालत नाही. प्रत्येक प्रशासकीय कृतीचा खंबीर आधार वित्तीय प्रशासनच असते.

**९. शासन खर्चात वाढ**

प्रशासकीय यंत्रणेवरील खर्च, नागरीकरण, लोकसंख्यावाढ, औद्योगिकरण, सरकारी क्षेत्रातील व्यापारी उलाढाल इत्यादी कारणांमुळे शासनाचा खर्च झपाट्याने वाढत आहे. शासनाला या वाढत्या खर्चाची तोंडमिळवणी करणे अवघड जात आहे. या सर्व बाबींचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष परिणाम वित्तीय प्रशासनावर होत असल्यामुळे वित्तीय प्रशासनाचे महत्त्व वाढत आहे.

**११. शासन महसूलात वाढ**

शासनाचा खर्च वाढला तसेच महसूलातही वाढ झाली. नवनवीन व जास्तीचे कर, चलन फुगवटा यासाठी करावी लागणारी कर पद्धतीही तितकीच महत्त्वाची असते. यामुळे वित्तीय प्रशासनावरील जबाबदारी व महत्त्व वाढले.

**११. योजनांवरील खर्च**

नियोजन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. भारतात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून नियोजन केले जाते. नियोजन आखणी व अंमलबजावणी ही कार्ये व्यापक



आहेत. नियोजित अर्थव्यवस्थेची सुसूत्रता व सुसंचालन सर्वस्वी वित्तीय प्रशासनावरील जबाबदारीत वाढ करतात.

**१२. सार्वजनिक कर्जात वाढ** -

राष्ट्राचा विकास करण्यासाठी साधनसामग्री आवश्यक असते. साधनसामग्रीची खरेदी करण्यासाठी शासनाला विविध वित्तीय संस्थांकडून कर्जे घ्यावी लागतात. यामुळे शासनाचा वित्तीय कारभार वाढतो त्याचबरोबर वित्तीय प्रशासनाचे महत्त्व वाढते.

**१३. बँका व पतपूरवठा करणाऱ्या संस्थांचा विस्तार**

राष्ट्राच्या विकासासाठी प्रामुख्याने ग्रामीण विकासासाठी देशात अनेक बँका स्थापन केल्या. सहकारी बँका व पतसंस्थांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. या बँका व पतसंस्था देशाच्या अर्थव्यवस्थेवर बरे वाईट परिणाम करू शकतात. या संस्थांकडे लक्ष पूरविणे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असते. त्यामुळे वित्तीय प्रशासनाची जबाबदारी व महत्त्व वाढते.

**१४. सार्वजनिक उपक्रमात वाढ**

शासनाने अनेक सार्वजनिक उपक्रम निर्माण करून व्यापारी क्षेत्रात प्रवेश केला. सार्वजनिक उपक्रमांना वित्तीय प्रशासनाच्या कार्यकक्षेतून वगळता येत नाही. त्यामुळे वित्तीय प्रशासनाची जबाबदारी वाढली, पर्यायाने महत्त्वही वाढले.

**१५. खा. उ. जा. मुळे वित्तीय प्रशासनाच्या महत्त्वात वाढ**

आधुनिक काळात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या वादळाचा सामना जगातील जवळपास सर्वच राष्ट्रांना करावा लागत आहे. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकरणाच्या धोरणानुसार राष्ट्राला आपल्या आर्थिक निती व अर्थव्यवस्थेत बदल करावे लागतात. यामुळे वित्तीय प्रशासनावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. वित्तीय प्रशासनाचे महत्त्वदेखील वाढले आहे.

वरील प्रमाणे वित्तीय प्रशासनाचे महत्त्व विशद करता येईल. देशाला कार्यक्षम प्रशासन यंत्रणा निर्माण करायची असेल तर चांगल्या वित्तीय प्रशासनाची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**वित्तीय प्रशासनाची अभिकरणे**

**(Agencies of Financial Administration)**

वित्तीय प्रशासनाची उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी पुढील काही प्रमुख साधने आहेत.

**१. कायदेमंडळ (The Legislature)**

आधुनिक लोकशाही राज्यात वित्तीय प्रशासनाचे अधिकार कायदेमंडळाकडे दिलेले असतात. कायदेमंडळाच्या कनिष्ठ गृहाला याबाबत अधिकार दिले जातात.

कायदेमंडळाला वित्तीय प्रशासनाची पुढीलप्रमाणे कार्ये करावी लागतात.

i) सरकारी पैसा उभारण्याचे व वेगवेगळ्या कार्यावर तो खर्च करण्याविषयी संपूर्ण अधिकार कायदेमंडळाकडे केंद्रित झालेले असतात. (Funds raising and funds granting authority)

ii) शासन विभागाकडून तयार केलेल्या अर्थसंकल्पाला मान्यता देणे, गरज भासल्यास त्यात फेरबदल करणे.

iii) शासनाच्या कार्यासाठी किती निधी जमा करावा आणि किती खर्च करावा याविषयी निर्णय घेणे.

iv) विविध प्रकारचे कर आकारणे, कर कमी अथवा रद्द करणे यासंबंधी कायदेमंडळ निर्णय घेते.

जोपर्यंत कार्यकारी मंडळाकडून पैशाची मागणी होत नाही तोपर्यंत कायदेमंडळ स्वत:हून खर्चास मान्यता देत नाही.

**२. कार्यकारी मंडळ (The Executive)**

कार्यकारी मंडळाकडून नवीन आर्थिक वर्षासाठी जमा व खर्चाच्या बाजू ठरवल्या जातात. त्यानुसार अंदाजपत्रक तयार केले जाते. भारतात अर्थखाते हे मध्यवर्ती खाते पुढीलप्रमाणे वित्तीय प्रशासनाची कार्ये करते.

i) नवीन आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करणे.

ii) शासकीय पैसा कोणकोणत्या बाबींवर कशा प्रकारे खर्च केला जाईल यासंबंधी निर्णय घेणे.

iii) शासकीय अधिकाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन व इतर आर्थिक बाबीसंबंधी निर्णय घेणे.

iv) आर्थिक नितीसंबंधी सर्व आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणे.



**३. वित्त मंत्रालय (Ministry of Finance)**

हा विभाग आर्थिक व्यवहारावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याचे कार्य करतो.

i) सरकारी पैसा योग्यप्रकारे खर्च होतो की नाही हे पाहणे.

ii) शासनाच्या विविध खात्यामार्फत खर्च होणाऱ्या पैशावर नियंत्रण व देखरेख ठेवणे.

iii) विविध करांची वसूली करणे.

iv) शासनाच्या विविध विभागात आर्थिक बाबतीत समन्वय प्रस्थापित करणे.

**४. हिशेब विभाग (Department of Audit)**

वित्तीय प्रशासनात हिशेब विभागाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. सार्वजनिक पैशाचा योग्य विनियोग व्हावा, वित्ताचा अपव्यय व भ्रष्टाचार यांना प्रतिबंध व्हावा म्हणून हिशेब विभाग आवश्यक समजला जातो. या विभागाकडून पुढील कार्ये केली जातात.

i) कायदेमंडळाने मंजूर केलेली रक्कम खात्याकडून योग्य रितीने खर्च होते की नाही यावर देखरेख ठेवणे.

ii) प्रत्येक खात्याचा खर्च योग्य व कायदेशीर बाबींवर होतो की नाही यावर देखरेख ठेवणे.

iii) प्रत्येक खात्याला मंजूर झालेल्या निधीचा खातेप्रमुखाकडून दुरुपयोग होत नाही. याविषयी दक्षता घेणे तसेच काटकसरीचे धोरण ठेवणे.

**५. संसदीय समित्या (Parliamentary Committees)**

कायदेमंडळ काही विशेष समित्या नियुक्त करून वित्तीय प्रशासनावर नियंत्रण ठेवते. वित्तीय प्रशासनासंबंधी दोन महत्त्वपूर्ण समित्या आहेत.

**i) अनुमान समिती (Estimate Committee)**

प्रशासनाच्या खर्चात काटकसर करण्यासंबंधी उपाय सुचविण्याचे कार्य अनुमान समिती करते. ही समिती मितव्ययतेची दक्षता बाळगण्यासंबंधीच्या सूचना कार्यकारी मंडळाला देऊ शकते.

**ii) लोकलेखा समिती (Public Accounts Committee)**

कार्यकारी मंडळाने केलेल्या खर्चाचा हिशेब तपासण्याचे कार्य ही समिती करते. नियंत्रक व महालेखा परीक्षकांकडून लेखापरीक्षणाचा अहवाल आल्यानंतर तो परत सार्वजनिक लेखा समितीच्या परिक्षणार्थ पाठविला जातो. नियंत्रक व महालेखा परीक्षकाच्या अहवालाचा अत्यंत बारकाईने अभ्यास ही समिती करते.

वरील अभिकरणे वित्तीय प्रशासनाची उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी कार्य करतात.

## वित्तीय प्रशासनाच्या इतर घटक संस्था
## (Other Agencies of Financial Administration)

वर उल्लेख केलेल्या अभिकरणा व्यतिरिक्त इतर अनेक घटक संस्थांचा संबंध वित्तीय प्रशासनाशी येतो. या संस्थेचे स्वरूप सहाय्यकासारखे असते. हे घटक पुढील प्रमाणे आहेत.

**१. सरकारी कोष** (Government Treasury)

सरकारी महसुल स्वीकारणे, सरकारी देणी देणे, त्याचे हिशेब ठेवणे आणि शासनाचा निधी सुरक्षित ठेवणे हे सरकारी कोषाचे कार्य असते. हे बरेचसे तांत्रिक स्वरूपाचे कार्य असते. कर आणि कर्ज याविषयीच्या सरकारी कोषाच्या जबाबदाऱ्या फार मोठ्या असतात. कर आणि कर्जाचा कायदेशीरपणा, वसुलीची पद्धती, प्रतिभूतीची खरेदी - विक्री, चलन निर्मिती या प्रत्येक बाबी अत्यंत गुंतागुंतीच्या आणि आर्थिक दृष्ट्या महत्त्वाच्या असतात. त्या प्रत्येक कार्यासाठी तज्ज्ञांची आवश्यकता असते. प्रत्येक खात्यांच्या तरतुदी कोषाधिकाऱ्याला माहित असाव्या लागतात आणि बेकायदेशीर पद्धतीने अधिक प्रमाणात उचल केली जात नाही. याविषयी त्याला दक्षता घ्यावी लागते.

**२. नियंत्रक व महालेखापरिक्षक** (Comptroller and Auditor General)

अंदाजपत्रकातील तरतुदी व उद्दिष्टांनुसार खर्च होतो की नाही हे तपासण्याचे कार्य नियंत्रक व महालेखापरिक्षक करतो. वित्तविषयक कलमांचा अर्थ सांगणे, वित्तीय व्यवहारासंबंधी मार्गदर्शन करणे, वित्तीय व्यवहारावर नियंत्रण ठेवणे, हिशेब ठेवणे ही कार्य तो करतो. वित्तीय वर्षाच्या शेवटी आपला लेखापरिक्षण अहवाल नियंत्रक व महालेखा परिक्षक राष्ट्रपतीला सादर करतो. या अहवालात वित्तीय व्यवहारातील उणिवा व गैर व्यवहार स्पष्टपणे नमूद केला जातो. या अहवालावर संसदेत चर्चा होते.

**३. अधिकोष** (Banks)

अनेक देशात सरकारी कोष आणि मध्यवर्ती अधिकोष यांची वित्तीय प्रशासनातील कार्ये सारखीच असतात. मध्यवर्ती अधिकोषा प्रमाणेच इतर अधिकोषावरही काही कार्ये सोपविली जातात. हे अधिकोष शासकीय नसले तरी शासनाचा महसूल सांभाळणे, विशिष्ट निधींचे हिशेब ठेवणे आणि शासनाच्या वित्तीय धोरणानुसार आर्थिक व्यवहार करणे ही कामे या अधिकोषांना करावी लागतात. भारतात रिझर्व बँक व स्टेट बँक ऑफ इंडिया ही कामे करतात. राजकोषिय ऋणपत्र



वठविणे, स्वीकारणे, त्यांच्या तारणावर अग्रिम देणे, ती पत्रे विकून देणे इत्यादी अनेक कार्यात त्यांचा सहभाग असतो. परंतु वित्तीय धोरण ठरविण्याबाबत मार्गदर्शन करणे, सल्ला देणे विदेशी चलनाचे साठे सांभाळणे, त्यांचे नियंत्रण करणे याबाबतही भारताच्या रिझर्व बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे.

**४. मंत्रिमंडळाची अर्थसमिती** (Economic Committee of the Cabinet)

मंत्रिमंडळ हे वित्त मंत्री व अन्य पाच मंत्र्यांची एक समिती नियुक्त करते. या समितीलाच अर्थसमिती म्हणतात. कोणकोणत्या बाबी मंत्रिमंडळापुढे आणावयाच्या याचा निर्णय ही समिती करते. या समितीला पुढील कार्ये करावी लागतात.

i) अर्थव्यवस्थेतील सरकारी व्यवहाराचे संचालन आणि संघटन करून त्याद्वारे अर्थव्यवस्थेचे नियमन करणे.

ii) केंद्र व राज्य स्तरावर विकास कार्यक्रमाची रूपरेषा आणि अग्रक्रम निश्चित करणे.

iii) दुर्मिळ साधनांचे वितरण अग्रक्रमानुसार करणे व ही साधने वाढविण्यांचा प्रयत्न करणे. उदा. विदेशी चलन.

वरील संस्था वित्तीय प्रशासनाची अभिकरणे म्हणून कार्य करतात. ही अभिकरणे राष्ट्राची अर्थव्यवस्था व वित्तीय व्यवहाराचे नियंत्रण करतात. या अभिकरणाच्या प्रयत्नामुळेच भारतातील वित्तीय प्रशासन उत्कृष्ट वित्तीय प्रशासन म्हणून ओळख निर्माण करीत आहे व भारत आर्थिक महासत्ता बनण्याकडे वाटचाल करीत आहे.

***